नियमीत फौजदारी खटला क्र. **७३/२०२३**
निशाणी क्र. **२४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सचिन सिताराम कवळे** |
| वय सुमारे | : | ३२ वर्षे, व्यवसाय : पाणी बॉटल सप्लाय |
| निवासस्थान | : | पदहूर, पो. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत</u>** :

पाणी सप्लाय करण्याचा व्यवसाय हा माझा स्वत:चा आहे व तो मी मागील सहा वर्षांपासून करतो. पाणी बॉटल विक्री मी स्वत: करतो. तो व्यवसाय मी 'श्री समर्थ एन्टरप्रायजेस' या नावाने करतो.

०२. दि. १२/०१/२०२३ रोजी मी पाणी बॉटल सप्लाय करण्यासाठी चोंढी परिसरामध्ये गेलो होतो. तेव्हा मला एका अज्ञात महिलेचा फोन आला. त्यांनी सांगितले की, आमच्या नेहमी अलिबाग येथे मिटींग्ज् होत असतात तेव्हा पाणी लागणार आहे. त्यासंबंधात मला तुमची भेट घ्यायची आहे. त्यांनी व्हॉटस्ॲपद्वारे माझ्याशी संपर्क केला. सदर महिला ही मुंबई येथून संपर्क साधत होती. तिचे नाव धनश्री शशिकांत टावरे असे होते. त्यांनी मला सांगितले की, पाणी बॉटल सप्लाय करण्यासाठी तुम्ही मुंबई येथे येवू शकता का? मी त्यांना सांगितले की, मी मुंबई येथे येवू शकत नाही. त्यावर त्यांनी सांगितले की, मी तुम्हाला भेटण्यासाठी मांडवा येथे येते.

०३. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ३.३० वाजता ठरल्याप्रमाणे त्यांनी मला

मांडवा येथे त्यांना घेण्यासाठी बोलावले. मी माझी मोटरसायकल घेवून त्यांना मांडवा येथून नवखार येथे अजित मोकल चालवत असलेल्या कॉटेजवर घेवून गेलो. तेथे आमच्या गप्पागोष्टी होवून आमचे शारीरीक संबंध झाले. त्यानंतर मी त्यांना ५.३० च्या दरम्यान मांडवा येथे परत सोडले. त्यानंतर मी मांडवा येथून परत येत असताना आवास फाटा येथे आल्यानंतर संजय सावंत यांचा मला फोन आला. तो म्हणाला की, तू आणि धनश्री यांच्यात झालेले संबंधांबाबत शशिकांत टावरे यांना समजलेले आहे. तर तू तेथून तलवडे येथे ये, आपण त्यावर काहीतरी सोल्यूशन काढू.

०४. मी तलवडे गावात गेलो असता त्यांनी सांगितले की, धनश्री माझ्या ओळखीची आहे, मी हा विषय येथेच संपवू शकतो त्यासाठी तू मला १० लाख रुपये दे. मी त्यांना सांगितले की माझ्याकडे एवढे पैसे नाहीत. तो म्हणाला, तुझा आताच जमिनीचा व्यवहार झालेला आहे त्याचे ७ लाख रुपये आहेत ते पैसे तू दे. मी बाजूच्याच गावातील माणसासोबत तो व्यवहार केला त्यामुळे त्याला समजले होते. त्याने सांगितले की, जर तू मला पैसे दिले नाहीस तर शशिकांत टावरे व त्यांची माणसे तुला जिवे ठार मारतील.

०५. संजय सावंत याने मला फोन क्र. ७०८३३८१०७७ वरुन फोन केला होता. मी त्यांना सांगितले की, २—३ दिवसांत पैसे जमा करुन देतो. त्यानंतर त्याने माझा मोबाईल त्यांच्या ताब्यात घेतला. धनश्री यांनी माझ्यासोबत जी व्हॉटस्ॲप चॅटींग केली होती ती पूर्ण डिलीट केली. त्यानंतर त्यांनी मला पैसे घेवून येण्यासाठी वारंवार फोन केले. मी त्यानंतर दि. १६/०१/२०२३ रोजी मी ७ लाख रुपये कॅश दुपारी १.३० ते १.४५ वाजताच्या दरम्यान संजय सावंत यांच्या हातात दिली. मी ती कॅश एस्.बी.आय्., शाखा अलिबाग येथून काढली होती.

०६. त्याने मला सांगितले की, हा विषय इथेच संपला, तू कोणाला सांगू नको. त्यानंतर दि. १४/०२/२०२३ रोजी मला व्हॉटस्‌अॅप व वादळवारा न्यूजवर बातमी समजली की संजय सावंत व धनश्री टावरे यांनी माझ्यासारख्या अनेक लोकांची फसवणुक केलेली आहे. हे समजल्यावर मी मांडवा पोलीस ठाण्यात गेलो व माझी फिर्याद दाखल केली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी—१ (निशाणी क्र. २५)** देण्यात येते. आता मला दाखवण्यात आलेली छापील फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी—२ (निशाणी क्र. २६)** देण्यात येते.

०७. फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी मला पुन्हा ज्या ठिकाणी मी संजय सावंत यांना पैसे दिले होते त्या ठिकाणी बोलावले होते. मी पोलीसांना ते ठिकाण दाखवले होते. पोलीसांनी त्या ठिकाणचे फोटो काढले व पंचनामा केला. आज संजय सावंत न्यायालयात हजर नाही. त्याच्या गैरहजेरीचा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. २ न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**आरोपींतर्फे निशाणी क्र. २७ कडील अर्जावरील आदेशावरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला**.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०७/०७/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्रीमती ए. ए. मोरे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>** :

०८. हे म्हणणे खरे आहे की, 'श्री समर्थ एन्टरप्रायजेस' हा माझा स्वत: पाण्याचा प्लॅन्ट नाही. मी सर्व प्रकारच्या कंपनीच्या सिलबंद पाण्याच्या बॉटल सप्लाय करत होतो. माझे परहुरपाडा येथे गोडावून आहे. मी रियल इस्टेट एंजट म्हणून काम करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पाणी पुरवठा करणे हा माझा एकमेव व्यवसाय आहे.

०९. हे म्हणणे खरे आहे की, परहुरपाडा येथील मला देण्यात आलेला प्लॉट हा गावठाण आहे. तो प्लॉट माझ्या मालकीचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्लॉटचे खरेदीखत होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो प्लॉट कोणाच्या नावावर चढवता येत नाही. साक्षीदार सांगतो की, नोटरी होते. हे मला माहिती नाही की, नोटरीद्वारे कोणत्याही मालमत्तेची मालकी बदलता येत नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ने मला फोन केला होता त्यावेळी त्यांना माझा नंबर कोणी दिला होता हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ला मी ओळखत नव्हतो. मी आरोपी क्र. २ कडे मिटींग संदर्भात चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मिटींगसाठी किती पाणी बॉटल लागतील याबाबत मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, एक बॉक्स लागत असेल तर त्याची डेलीव्हरी अलिबागच्या बाहेर करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, १० ते १२ बॉक्स लागत असतील तर मी स्वत: जावून डेलीव्हरी करतो.

११. मला १२ तारखेला जो फोन आला होता त्यावेळी त्या महिलेशी

माझे दोन मिनिटे बोलणे झाले. १२ तारखेला त्याच दिवशी रात्री माझे आरोपी क्र. २ शी पुन्हा बोलणे झाले. हे म्हणणे खरे आहे की, दि. १२/०१/२०२३ रोजी मी मुंबईला येणार नाही म्हणून नकार दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी नकार दिल्यानंतर त्यांनी मला पुन्हा फोन केला नाही. दि. १३/०१/२०२३ रोजी ती महिला ४:०० ते ४:१५ वाजता मांडवा जेट्टी येथे आली. मांडवा जेट्टी ते नवखार यातील अंतर ५ ते ६ कि.मी. आहे. मांडवा जेट्टी येथे महिला भेटली त्यावेळी आमच्यात पाण्याच्या बॉटलसंदर्भात बोलणे झाले होते. मांडवा जेट्टीवरुन आम्ही पाच मिनिटांनी बाहेर पडलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मांडवा जेट्टी येथे बोट ४:३० वाजता येते व तेथून पार्कींगसाठी पाच मिनिटे लागतात. मांडवा जेट्टीवर आम्ही ४:४५ वाजेपर्यंत होतो.

१२. माझा कोणताही क्लाएंट मला भेटण्यासाठी आल्यावर मी त्याला त्याच लॉजवर नेत नाही. त्या लॉजवर एन्ट्री केली नव्हती. मी ज्या दिवशी तेथे गेलो त्या दिवशी लॉजचा मालक अजित मोकल तेथे नव्हता. मी तेथे जाताना अजित मोकल याला फोन केला होता.

१३. सात लाख रुपये कोणत्या चेक क्रमांकाने आले हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, संजय सावंत याला मी आधीपासून ओळखतो. संजय सावंत व मी आजूबाजूच्या गावात राहतो. जागेचा व्यवहार संजय सावंत याने केलेला नाही. जागेच्या व्यवहारामध्ये कोणीही मध्यस्थ नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी जो चेक क्रमांक सांगितला आहे त्या चेकने माझ्या खात्यात कोणतेही पैसे जमा झालेले नाहीत. व्यवहाराच्या वेळेला मला दोन चेक दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या खात्यात अशा प्रकारचे कोणतेही चेक जमा नाहीत.

१४. दि. १३/०१/२०२३ रोजी त्या अर्ध्या तासामध्ये आरोपी क्र. २ हिला कोणाचेही फोन आले नव्हते व ती कोणाशीही बोलली नव्हती. मी शशिकांत टावरे याला आजपर्यंत ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी शशिकांत टावरेला घडलेली घटना कशी कळली याबाबत मी आरोपी क्र. १ व २ यांच्याकडे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: शशिकांत टावरेला भेटून विषय क्लीयर करण्याचा प्रयत्न केला नाही. असे घडले नाही की, पैसे देण्याआधी आरोपी क्र. १ संजय सावंत याने माझ्या मोबाईलमधील चॅट व फोटो डिलीट केले होते. माझा अॅन्ड्रॉइड फोन होता परंतु बॅक अप नव्हते.

१५. हे म्हणणे खरे आहे की, मी गुन्हा दाखल केला त्यावेळी माझ्याकडे कोणतेही फोटो व चॅट नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दि. १३/०१/२०२३ ते गुन्हा दाखल करेपर्यंत मी कोणालाही घटनेबाबत सांगितले नव्हते. हे मला माहिती नाही की, दि. १२/०२/२०२३ रोजी आरोपींना दुसऱ्या गुन्ह्यात अटक झाली होती व त्याच दिवशी त्यांना जामीन झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला सोनके साहेबांनी बोलावून घेतले होते व आरोपींविरुद्ध तक्रार देण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सोनके पोलीसांच्या सांगण्यावरुन मी झिराड येथे जावून तक्रार दिली होती.

१६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने मला बोलावून घेतले व आमच्यात शारीरिक संबंध झाले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र. २ ते ५ मधील मजकूर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कुठलेही पैसे संजय सावंत याला दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी तक्रार दाखल

केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.	( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०९/१०/२०२५**.	मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७३/२०२३**
निशाणी क्र. **३३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सौरभ कृष्णा पाटील** |
| वय सुमारे | : | २६ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | मु. जांभुळपाडा, पो. कामार्ले, ता. अलिबाग |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. १५/०२/२०२३ रोजी मला तळवडे गावात कच्च्या रस्त्यावर हाशिवरे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पोलीसांनी बोलावले होते. पंचनामा ९:३० ते १०.३० वाजेपर्यंत झाला. पंचनाम्यासाठी विशाल पाटील, सचिन कवळे व पोलीस हजर होते. घटनास्थळ सचिन कवळे यांनी दाखवले. घटनास्थळ हे शेताच्या बाजूला होते. पोलीसांनी पंचनामा केला व फोटो काढले. पंचनामा मला दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **पी—३ निशाणी क्र. ३४** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्रीमती अर्चना मोरे यांचेमार्फत</u>** :

०२. यापूर्वी मी पंच म्हणून कोणताही पंचनामा केलेला नाही. पोलीसांकडे माझा फोन क्रमांक कसा आला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे गाव व घटनास्थळ यामध्ये दोन कि.मी. अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या ३—४ कि.मी. अंतरामध्ये ३ ते ४ गावे आहेत. हे म्हणणे खरे आहे

की, घटनास्थळाच्या रस्त्यावर सतत वर्दळ असते. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलीसांनी फोन करुन पंचनाम्यासाठी बोलावले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या गाडीवर ड्रायव्हर होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीचा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने मला पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी फिर्यादीसोबत न्यायालयात आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. १५/०२/२०२३ रोजी पंचनाम्यासाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **२७/११/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७३/२०२३**
निशाणी क्र. **३६/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **अजित रामचंद्र मोकल** |
| वय सुमारे | : | ४६ वर्षे, व्यवसाय : रिसॉर्ट |
| निवासस्थान | : | मु. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>** :

०१. जानेवारी—२०२३ मध्ये मी नवखार येथे हेमंत पाटील यांच्या मालकीचा आर. के. बीच रिसॉर्ट चालवायला घेतला होता. सदरचा रिसॉर्ट मी स्वत: चालवत होतो. मी रिसॉर्टचे रजिस्टर मेन्टेन करत होतो. मी येणाऱ्या ग्राहकांच्या ओळखीकरीता त्यांचे आधार कार्ड किंवा पॅन कार्डची प्रत घेत होतो.

०२. दि. १३/०१/२०२३ रोजी माझ्या ओळखीचा इसम सचिन कवळे याने मला ३:३० वाजता फोन केला व मला विचारले की माझ्यासोबत एक मॅडम आहेत व त्यांना फ्रेश होण्याकरीता एक तासाकरीता रुम हवी आहे. ४:४५ वाजताच्या सुमारास सचिन कवळे रिसॉर्टमध्ये एक महिलेसोबत आले. मी त्यांची रजिस्टरमध्ये नोंद करुन घेतली व त्यांच्याकडून आधारकार्डची झेरॉक्स प्रत घेतली. त्या महिलेचे नाव धनश्री टावरे असे होते. मी त्यांना १० नंबरच्या खोलीची चावी दिली. त्यानंतर ते दोघेही रुममध्ये गेले. ते ५:३० वाजताच्या सुमारास रुममधून परत आले.

०३. १८ फेब्रुवारीला मला झिराड पोलीस ठाण्यातून फोन आला की,

तुमचे रिसॉर्टचे रजिस्टर घेवून पोलीस ठाण्यात या. मी रजिस्टर घेवून गेलो. मला पोलीस ठाण्यात सांगण्यात आले की, त्या दोघांमध्ये शारीरिक संबंध झालेले आहेत. त्यानंतर असे सांगण्यात आले की, सचिन कवळे यांना संजय सावंत यांच्याकडून अशी कल्पना देण्यात आली की, तुमच्या दोघांमध्ये जे संबंध आलेले आहेत ते महिलेच्या पतीला समजले आहे व तो तुम्हाला मारण्यास येणार आहे. त्यानंतर सावंत यांनी सांगितले की, त्या महिलेचा पती माझ्या ओळखीचा आहे तर मी त्या दोघांची समज घालून प्रकरण मिटवीन व त्याच्याकडून सात लाख रुपयांची मागणी केली. सचिन कवळे यांनी सात लाख रुपये दिल्याबाबत पोलीसांनी मला सांगितले होते.

०४.　　आता मला दाखवण्यात आलेल्या रजिस्टरची प्रत मी पोलीसांना दिली होती. ती आमच्या रिसॉर्टची आहे. ती माझ्या हस्ताक्षरात आहे. त्यामध्ये सचिन कवळे व धनश्री टावरे यांच्या नावाची रिसॉर्टमध्ये प्रवेश (Entry) व बाहेर पडल्याबाबतची (Exit) नोंद आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **पी—४ निशाणी क्र. ३७** देण्यात येते. मी मूळ रजिस्टर न्यायालयात आणण्यास तयार आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकुश मोरे यांचेमार्फत</u>** :

०५.　　मी सन २०२२ पासून रिसॉर्टचा व्यवसाय चालू केला. हे म्हणणे खरे आहे की, हेमंत पाटील यांच्याकडून रिसॉर्ट चालवायला घेतल्याबाबत ॲग्रीमेंट पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, रिसॉर्ट चालवायला घेण्याबाबतचा ॲग्रीमेंट रजिस्टर्ड नाही. हे म्हणणे खरे नाही की, एक तासाकरीता कोणालाही रुम देत नाही.

०६. दि. १२/०१/२०२३ रोजी माझ्या रिसॉर्टमध्ये कोण कोण लोक आले होते त्यांची नावे मी रजिस्टर न पाहता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. १४/०१/२०२३ रोजी माझ्या रिसॉर्टमध्ये कोण कोण लोक आले होते त्यांची नावे मी रजिस्टर न पाहता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेपूर्वी धनश्री टावरे माझ्या ओळखीची नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, धनश्री हिला ओळखण्यासाठी पोलीसांनी मला जेलमध्ये किंवा पोलीस ठाण्यात बोलावले नव्हते. माझ्या घरापासून रिसॉर्ट १० कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सचिन कवळे हा पूर्वीपासून माझ्या चांगल्या ओळखीचा आहे. यापूर्वी सचिन कवळे याने माझ्याकडून एक तासासाठी रुम घेतली नव्हती.

०७. फोन आला त्यावेळी मी रिसॉर्टमध्येच होतो. त्यावेळी माझ्या रिसॉर्टला कोणीही कामाला नव्हते. ॲडव्हान्स बुकींग असेल तर लोक येण्याआधी त्यांच्या नावाची नोंद रजिस्टरमध्ये करतो. मूळ रजिस्टर पोलीसांनी जप्त केले नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, रजिस्टर पोलीसांना दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, रिसॉर्टमध्ये येणाऱ्या प्रत्येक इसमाला मी स्वत: ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यात आल्यानंतर सगळ्या घटना पोलीसांनी मला सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सचिन कवळे याने मला घटनेबाबत सांगितलेले नाही. मी धनश्री टावरे यांच्या नवऱ्याला ओळखत नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, माझा जबाब घेईपर्यंत मी संजय सावंत यांना ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला सांगितल्यामुळे आरोपीने खंडणी मागितल्याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, धनश्री टावरे ही रिसॉर्टमध्ये आली होती हे मी सचिन कवळे हा माझा

मित्र असल्यामुळे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **२२/०१/२०२६**.
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७३/२०२३**
निशाणी क्र. **४०/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **संतोष शशिकांत कवळे** |
| वय सुमारे | : | ५२ वर्षे, व्यवसाय : रिसॉर्ट |
| निवासस्थान | : | मु. वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. धनश्री टावरे हीने फेसबुकवरुन माझ्याशी संपर्क साधला व त्यांनी माझ्याकडे माझ्या रिसॉर्टची चौकशी केली. त्यांनी माझ्याकडून माझा मोबाईल क्रमांक मागितला. त्यांनी व्हॉटसॲपवरुन अर्धनग्न फोटो मला पाठविले. त्यानंतर त्यांनी फोनवरुन मला सांगितले की, तुम्ही मला भेटायला मुंबईमध्ये या नाहीतर मी तुम्हाला भेटायला मांडवा येथे येईन. त्यानंतर माझ्या कामासाठी मी ठाणे येथे गेलो होतो. तेथे माझी त्यांच्याशी भेट झाली. तिने मला सांगितले की, मला महत्वाचे बोलायचे आहे आपण लॉजवर जावू या. त्यानंतर लॉजवर गेल्यावर ती माझ्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत होती. त्यानंतर आमच्या दोघांच्याही संमतीने शारीरिक संबंध झाले.

०२. त्यानंतर दोन दिवसांनी मला अज्ञात व्यक्तीचा फोन आला. त्याने मला सांगितले की, ठाण्याच्या लॉजवरील व्हिडीओ माझ्याकडे आहे. माझ्याकडे त्यांनी २५ लाख रुपयांची खंडणी मागितली. ते म्हणाले की, जर तुम्ही पैसे दिले नाहीत तर सदरचा व्हीडीओ मी तुमच्या फॅमिलीमध्ये व्हायरल करीन. मी म्हणालो की, माझ्याकडे तेवढे पैसे नाहीत, तुम्हाला जे काही करायचे असेल ते तुम्ही करा.

त्यानंतर मी त्यांचा फोन कट केला आणि झालेली घटना मी माझ्या मित्रांसोबत शेअर केली आणि दोघांचेही फोन क्रमांक ब्लॉक करुन टाकले आणि व्हॉटसॲपवरुन देखील त्यांना ब्लॉक केले.

०३. थोड्या दिवसांनी मी वर्तमानपत्रात बातमी वाचली. मित्रांच्या चर्चेतून मला समजले की, मांडवा पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध खंडणीसंदर्भात गुन्हा दाखल झाला आहे. त्यांनी कवळे यांच्याकडून देखील खंडणी घेतली होती. मला समजल्यानंतर मी मांडवा पोलीस ठाण्यात जावून माझ्याकडे देखील त्यांनी २५ लाख रुपयांची खंडणी मागितल्याबाबत जबाब दिला. आरोपी क्र. २ आज रोजी कोर्टात हजर आहे. मी आरोपी क्र. १ ला ओळखत नाही.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकुश मोरे यांचेमार्फत</u>** :

०४. माझे रिसॉर्ट वरसोली येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सध्या ते रिसॉर्ट मी चालवण्यासाठी दिले आहे. दि. १६/०१/२०२३ पासून ते दि. १८/०२/२०२३ पर्यंत मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली नाही. दि. १६/०१/२०२३ रोजी मी ठाणे येथे माझ्या सासरी गेलो होतो. असे घडत नाही की, कोणत्याही महिलेने मला सांगितले की आपण लॉजवर जावू यात तर मी त्यांच्यासोबत जातो. असे घडत नाही की, कोणीही माझ्याशी जवळीक साधली तर आमचे शारीरिक संबंध येतात.

०५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने कधी माझ्याशी फेसबुकवर संपर्क साधला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्या तारखेला ते

रिसॉर्टवर येणार आहेत ते सांगितले नव्हते. ज्या नंबरवरुन मला फोन आला होता तो क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना व्हॉटस्अॅप व फेसबुकचे मेसेज दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा माझा मित्र असल्यामुळे मी त्याच्या बाजूने खोटा जबाब दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ने माझ्याकडे पैसे मागितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. १ संजय सावंत याला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फोनवरुन पैसे मागणारा इसम संजय सावंत होता का हे मी सांगू शकणार नाही.

०६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने फेसबुकवरुन संपर्क साधला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी माझ्याकडे माझ्या रिसॉर्टची चौकशी केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी माझ्याकडून माझा मोबाईल क्रमांक मागितला, त्यांनी व्हॉटसअॅपवरुन अर्धनग्न फोटो मला पाठविले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर त्यांनी फोनवरुन मला सांगितले की, तुम्ही मला भेटायला मुंबईमध्ये या नाहीतर मी तुम्हाला भेटायला मांडवा येथे येईन हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, लॉजवर गेल्यावर ती माझ्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर दोन दिवसांनी मला अज्ञात व्यक्तीचा फोन आला, त्याने मला सांगितले की, ठाण्याच्या लॉजवरील व्हिडीओ माझ्याकडे आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे त्यांनी २५ लाख रुपयांची खंडणी मागितली, ते म्हणाले की, जर तुम्ही पैसे दिले नाहीत तर सदरचा व्हीडीओ मी तुमच्या फॅमिलीमध्ये व्हायरल करीन हे मी खोटे

सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२३/०३/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.